## महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बल सशस्त्र पोलीस शिपाई भरती सन २०१९

## जाहिरात

## भारत राखीव बटालीयन-२, राज्य राखीव पोलीस बल गट क्र १५, बिरसी गोंदिया कॅम्प नागपूर.

--------०००--------

महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरूष) (सेवाप्रवेश) नियम-२०१२ व त्यामध्ये शासनाने दिनांक १८/०१/२०१९ व दिनांक ०२/०८/२०१९ च्या आदेशान्वये सुधारीत केलेल्या तरतुदींनुसार समादेशक, भारत राखीव बटालीयन-२, राज्य राखीव पोलीस बल गट क्र १५, बिरसी गोंदिया (कॅम्प नागपूर) या आस्थापनेवर सन २०१९ मध्ये सशस्त्र पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी ३८ पदे भरण्यासाठी सशस्त्र पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

१) **सशस्त्र पोलीस शिपाई :**

| | अजा | अज | विज-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | इडब्ल्युएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | **३** | **०** | **०** | **२** | **४** | **२** | **०** | **५** | **४** | **४** | **१४** | **३८** |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ३ | ० | ० | २ | ३ | २ | ० | ४ | ३ | ३ | ८ | **२८** |
| खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | **१** |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | **१** |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **०** |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | १ | १ | २ | **६** |
| अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | **१** |
| पोलीस पाल्य | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **०** |
| गृहरक्षक दल | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | **१** |
| अनाथ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **०** |
| **एकूण** | **३** | **०** | **०** | **२** | **४** | **२** | **०** | **५** | **४** | **४** | **१४** | **३८** |

**अ)** उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१९ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

**ब)** अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

**क)** पदोन्नतीवरील आरक्षणा संदर्भात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचीका क्रमांक १७५/२०१८ व इतर सलंग्न याचीकांमध्ये दिनांक २७/०६/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेलल्या याचीकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांचा संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्यांची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती

अधिकारी यांना पदे भरण्याच्या अधिकार आहे. त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

ड) शासनाने लागु केलेले खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी लागु केलेले आरक्षण हे या अनुषंगाने उद्‌भवणाऱ्या न्यायालयीन प्रकणातील अंतिम निर्णयाच्या अधिन असेल.

**३) महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश) नियम -२०१२ व त्यामध्ये सुधारणा केल्याबाबतच्या दिनांक १८/०१/२०१९ व दिनांक ०२/०८/२०१९ चे आदेश** www.mahapolice.gov.in **या संकेत स्थळावर (Home Page) वर व** www.maharashtrasrpf.gov.in **वर उपलब्ध असुन ते त्या त्या पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागू राहतील.**

**महत्त्वाची टिप:-**

राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती ॲन्टीकरप्शन ब्युरो, नागपूर यांना **दुरध्वनी क्रमांक (०७१२-२५६१७१९)** वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार समादेशक, भारत राखीव बटालीयन-२, राज्य राखीव पोली बल गट क्र १५, गोंदिया कॅम्प नागपूर कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, सशस्त्र पोलीस भरती समिती-२०१९ यांच्याशी संपक्र साधुन तक्रार करु शकतील, तसेच तसेच अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात ०२२-२२८५५६१४ या दुरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था / कार्यालयाचे नाव | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १ | समादेशक, भाराब -२, रा.रा.पो.बल गट क्र १५, गोंदिया कॅम्प नागपुर कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | ०७१०४-२३२११४ |

**( जावेद अनवर)**
समादेशक
भारत राखीव बटालीयन-२,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र १५,
गोंदिया कॅम्प नागपुर